# राजदिप को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई

H.O 3/109, Kala CHSL,Khernagar, Co-Op. Society, Bandra (E) 400 051.
Email ID : rajdeepcredit@gmail.com Website : www.rajdeepcredit.com Mob No : 7977543356

---

## अ) सभासद (Member) बनण्यासाठी लागणारी आवश्यक कागद पत्रे आणि शुल्क :-

• सदर व्यक्ती संस्थेच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असावा.

• सभासदाकडूनरुपये ५० प्रवेश फी, रु ५० सभासद कल्याण निधी, रु १० फॉर्म, रु १०० भागरक्कम खात्यात आणि रु.१००/- बचत खात्यात आकारली जाईल.

• सभासद अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडण्यात यावी.

१) पॅन कार्ड २) आधार कार्ड ३) काम करत असलेल्या कार्यालयाचे ओळखपत्र. ४) अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.५) कॅन्सल चेक.

• सभासद अर्जामध्ये वारसाची नोंद असणे आवश्यक आहे.

• सभासद होण्याकरीता सभासदाचे वय १८ वर्षे पुर्ण असले पाहिजे.

• संस्थेच्या सभासदापैकी एका सभासदाची शिफारस आवश्यक आहे.

## ब) भाग रक्कम वर्ग करण्याची पध्दत (Transfer) :-

- नामनिर्देशित व्यक्तीचा विनंती अर्ज (मूळ भाग प्रमाणपत्र)सादर करणे.
- सभासदाच्या मृत्यूचा दाखला.

## क) भाग प्रमाणपत्र दुय्यम प्रत मिळणेबाबत :-

- सभासदांकडून हरविलेल्या भाग प्रमाणपत्रची दुय्यम प्रत मिळणेबाबतचा अर्ज.
- विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्रासह प्रस्ताव सादर करावा.
- सभासदांकडून प्रत्येक दाखल्यासाठी रु.५० शुल्कभरावी लागेल.
- मुख्यालयाचीमंजूरीमिळाल्यानंतर भाग प्रमाणपत्रची दुय्यम प्रत देण्यात येईल.

ड) **भाग रकमेवर लाभांश ( dividend )**

i) लाभांश (dividend) संस्थेच्या वार्षिक नफ्यावर अवलंबून असतो व तो सहकार खात्याच्या नियमानुसारवार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये (AGM) घोषित केला जातो.

ii) लाभांश मिळण्याकरिता सभासदांचे संस्थेत बचत खाते असणे आवश्यक आहे किंवा त्यांनी त्यांच्या बँक खात्याची माहिती संस्थेत देणे आवश्यक आहे, जेणेकरून लाभांश त्यांच्या बँक खात्यात जमा केला जाईल.

**इ) लाभांशाचा दावा रद्द करणे बाबत ( unclaimed dividend )**

९७ घटना दुरुस्तीनुसार किमान ३ वर्षांचा लाभांश देण्यात येईल व ३ वर्षाआधीचालाभांश राखीव निधी ( Reserve Fund) मध्येजमा केला जाईल.

## ई) भाग रक्कम परत मिळणेबाबत :-

१) सभासद सदस्यत्व किमान ५ वर्षे रद्द करता येणार नाही.

२)सभासदाचेसदस्यत्व रद्द केल्यानंतर भाग आणि बचत खात्यातील जमा रक्कममूळ भाग प्रमाणपत्र सादर केल्यास परत करण्यात येईल.

३) भाग रक्कम परत मागणारा सभासद कोणास जामीन आहे कि नाही याची खात्री करण्यात येईल, जर जामीनअसेल तर सदस्यत्व रद्द केले जाणार नाही.

४) अर्जासोबत मूळ भाग प्रमाणपत्र ( Original Certificate) जोडणे अनिवार्य आहे.

५)मुख्यालयाची मंजुरी मिळाल्यानंतर जमा रक्कम परत करण्यात येईल.

राजदीप कॉ ऑप क्रेडिट सोसायटीच्या सभासदाचे शुल्क भरण्यासाठी खाली दिलेल्या QR कोडवर स्कॅन करून आपले सभासद शुल्क भरावे.




राजदीप कॉ ऑप क्रेडिट सोसायटीच्या सभासद बनण्यासाठी या लिंकवर क्लिक करा.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSd_95lfmQljjt0EQO7hpq7Q3u5HEtSLMLopWsHpQLoSjGzx-g/viewform?usp=pp_url